**<u>नि.दि.दा.क्र.३०५/२०१६</u>**
नि.क्र.१२३ लगत.
दि.२०.०७.२०२६

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा शपथेवर जबाबः</u>**

नाव :- **प्रविण माधवराव भागवत**

७. <u>माझ्या सरतपासातील सर्व मजकूर मला माझ्या वकीलांनी वाचून, समजून सांगितलेला असून तो माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे.</u>

श्रवणोत्तर स्वीकृत.
SD/-
(एस.ए.विराणी)
दि. २०.०७.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

**<u>पुढील सरतपास वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. बी.आर.फडके यांच्यातर्फेः</u>**

८. आता मला दाखविण्यात आलेली नि.३/४ वरील नोटीस ही मी माझ्या वकीलांमार्फत प्रतिवादींना दि.१६/११/२०१५ ला पाठविलेली होती. सदर नोटीशीची स्थळ प्रत हजर केलेली आहे. त्यावर माझे वकील श्री. फडके यांची सही आहे. त्यातील मजकूर माझ्या माहीतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. १३५</u>** देण्यात येते.

९. आता मला दाखविण्यात आलेली नि.३/५ वरील उत्तर नोटीस हे माझ्या वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीशीला उत्तर म्हणून दिनांक ०८/१२/२०१५ रोजी माझ्या वकीलांच्या नावे प्राप्त झाले होते. सदरचे नोटीस उत्तर हे अस्सल मुळ प्रत असल्यामुळे आणि प्रतिवादींना ते मान्य असल्यामुळे त्यास **<u>नि. १३६</u>** देण्यात येते.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ३, ७अ व ८ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए.एस.महाजन यांच्यामार्फत शपथेवर सुरुः-</u>**

१०. माझे शिक्षण इयत्ता दहावीपर्यंत झालेले आहे. मी प्रस्तुतचा दावा गट नं. ५७१ साठी दाखल केलेला आहे. गट नं. ५७१ चा सव्हे नंबर मी सांगू शकतो. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यात वाद मिळकतीचे सव्हे नंबर नमूद केलेले नाहीत. प्रतिवादीचे गट नं. ८२४ चा फाळणीबारा झाला आहे अगर कसे याबाबत मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रस्तुतचा दावा अतिक्रमण काढून मिळणेसाठी केलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींनी केलेल्या अतिक्रमणाबाबत दाव्यासोबत कच्चा नकाशा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींची गट नं. ८२४ ही वडीलोपार्जित मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींचे रहाते घर गट नं.८२४ मध्ये आहे. हे म्हणणे खरे नाही की, ते घर वडीलोपार्जित आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचे दुधांचा व्यवसाय आहे. साक्षीदार म्हणतो की त्यांनी फक्त गाय ठेवली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यात आणि प्रतिवादी यांचेमध्ये मिळकतीवरुन गेले तीस–चाळीस वर्षापासून वाद सुरु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. ८२४ च्या पश्चीमेला माझ्या मालकीची मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. ८२४ च्या पुर्वेला देखील माझ्या मालकीची मिळकत आहे. मो.र.नं. १४११/२०१३ आणि १४२२/२०१३ या दोन्ही मोजण्या मी दिलेल्या अर्जावरुन भुमी अभिलेख यांनी केलेल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मालकीचे सव्हे नं. ५२६ आणि प्रतिवादीच्या मालकीचा सव्हे नं. ३३२ यांच्यामध्ये दक्षिणोत्तर सव्हे नंबरचा बांध होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आणि प्रतिवादींच्या मिळकतीच्या उत्तर बाजूने कॅनॉल गेलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आणि प्रतिवादींच्या मिळकतीच्या उत्तर–दक्षिण अशी पोटचारी गेली होती. हे म्हणणे खरे आहे की, कॅनॉलसाठी संपादन झालेल्या क्षेत्राचा उल्लेख माझ्या अथवा प्रतिवादीच्या ७/१२ नमूद केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मिळकतीच्या पश्चीम बाजूला ओढा आहे. हे म्हणणे खरे नाही की, तो ओढा पश्चीम बाजूने वर्तुळ आकारात आहे. ओढयाचे क्षेत्र किती आहे हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, कॅनॉलच्या दोन्ही बाजुला प्रतिवादीचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दाखल केलेल्या मोजणी नकाशात प्रतिवादींचे कॅनॉलच्या उत्तर बाजुचे क्षेत्र दाखविलेले नाही. मी दाखल केलेल्या मोजणी नकाशात कॅनॉल कंट्रोलचे क्षेत्र दाखविलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, भुमी अभीलेख यांनी मोजणी करण्यापुर्वी प्रतिवादींना नोटीस दिलेल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, भुमी अभिलेख यांच्या नकाशा व्यतिरीक्त इतर कागदपत्रे हजर केलेले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आता मला दाखविलेल्या नि.१२९ वरील नकाशात माझ्या मालकीचे गट नं. ५७१ च्या पश्चीम बाजुने जाणारा ओढा हा तिरका आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयातुन कोर्ट कमिशनर नेमणकीचे आदेश झाल्यानंतर मी भुमी अभीलेख ऑफिसमध्ये मोजणीचे पैसे भरले होते. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीचे पैसे भरत असताना भुमी अभिलेख ऑफिस मधून चतुःसिमा बाबत अर्ज घेण्यात

आला होता. माझ्या मिळकतीच्या पुर्वेला प्रतिवादींचे क्षेत्र गट नं. ८२४ आहे. हे म्हणणे खरे आहे की,आता मला दाखविण्यात आलेला नि.३२ च्या अहवालासोबत मी दिलेला अर्जावर पुर्व बाजूला प्रकाश विठ्ठल भागवत, रोहिदास विठ्ठल भागवत, चेतन विनायक भागवत व इतर संजय म्हस्के असे नमूद केलेले आहेत. सदरचा कागद उलटतपासात दाखविलण्यात आलेल्यामुळे व साक्षीदाराने मान्य केल्यामुळे त्यास **निशाणी १३७** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, प्रकाश विठ्ठल भागवत, रोहिदास विठ्ठल भागवत, चेतन विनायक भागवत व  संजय म्हस्के यांची नावे गट नं. ८२४ च्या ७/१२ उता–याला नमूद नाहीत. वादातील मोजणी भुमी अभिलेख खात्याने त्यांच्याकडे उपस्थित असलेल्या रेकॉर्डच्या आधारे केलेली होती. भुमी अभिलेख अधिकारी यांनी मोजणी करतेवेळी सव्हे नंबरचा बांध दाखविलेला होता. मी माझ्या आणि प्रतिवादींच्या मिळकतीमधला सव्हे नंबरचा बांध दाखविलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, बांध दाखविते वेळी जुना सव्हे नंबरचा दगड दिसून आला नाही. हे म्हणणे खरे नाही की, जुना सव्हे नंबरचा दगड दिसून आला नसल्यामुळे मी दाखविलेल्या हद्दीप्रमाणे मोजणी करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, मोजणी करतेवळी कॅनॉलच्या क्षेत्राची मोजणी देखील करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, कोर्ट कमिशनरने मोजणी करतेवळी पश्चीमबाजुच्या ओढयाची मोजणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, कॅनालची मोजणी की कंट्रोल क्षेत्राला धरुन करण्यात आलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या क्षेत्रात १४ आर इतके अतिक्रमण करण्यात आलेले आहे हे दाखविण्यासाठी माझ्या तोंडी शब्दाव्यतिरिक्त इतर कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, कोर्ट कमिशनरची मोजणी झाल्यानंतर त्यांनी तयार केलेला नकाशा मी पाहिलेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादींना वकीलांमार्फत पाठविलेल्या नोटीशीमध्ये त्यांनी कधी अतिक्रमण केले हे नमूद केलेले नाही. साक्षीदार म्हणतो मोजणी झाल्यानंतर अतिक्रमणाबाबत समजले असे नोटीशीमध्ये नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी पाटबंधारे विभागाला कॅनॉलच्या पुलासंबंधी अर्ज दिला होता. तो अर्ज आणि त्यावरील उत्तर मी भुमी अभिलेख यांना मोजणी करतेवेळी दिल्याचे आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींचे रहाते घर आणि गोठा विकत घेण्यासाठी मी प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींनी माझ्या मिळकतीत कसल्याही प्रकारे अतिक्रमण केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पुर्ण.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत.

SD/-
**(एस.ए.विराणी)**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
दौंड, जि. पुणे.

दि. २०.०७.२०२६.